जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २४२** **दिनांक :- ०६/०९/२०२१**

**घरफोडी करणा-यास २४ तासामध्ये पकडुन ३,१४,०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व मोबाईल जप्त करुन २ गुन्हे उघडकीस करण्यास तुळींज गुन्हेप्रकटीकरण पथकास यश.**

तुळींज पोलीस ठाण्याचे हददीत दिनांक ०३/०९/२०२१ रोजी रात्रौ १.३० वाजता ते सकाळी ०८.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी श्रीमती सुप्रिया संजय वाडकर वय ५८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, राह - रुम नं. डी-०५, महालक्ष्मी अपार्टमेंट, विघ्नहर्ता सोसायटी, क्रिस्तराज शाळेच्या बाजुला, गालानगर, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर यांचे राहते घरातुन एकूण ३,१४,०००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागीने आणि रोख रक्कम चोरी झाल्याने तुळींज पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.नंबर I ११०२/२०२१ भादंविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दिनांक ०३/०९/२०२१ रोजी १७.१० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून तुळींज पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील तांत्रिक पुरावे व गुप्त बातमीदारांच्या आधारे नालासोपारा पुर्व येथुन आरोपीत प्रथम पंढरीनाथ मुनगेकर वय १९ वर्ष रा.रुम नं ४०७ ए विंग गजानन अपार्टमेंट क्रिस्टराज स्कुल जवळ पाच अंबा नालासोपारा पुर्व यास २४ तासाचे आत ताब्यात घेऊन दिनांक ०४/०९/२०२१ रोजी अटक करुन आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलेले एकुण ३,१२,०००/- रुपये किमतीचे १२४.९३७ ग्रॅम वजनाचे सोन्या चांदीचे दागीने व वेगवेगळया कपंनीचे ३ मोबाईल, असे एकूण ३,१२,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन त्याचे कडून एकुण २ गुन्हे उघडकीस आणले आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परि.मंडळ -२, श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. संदेश पालांडे, सपोनि. एम.डी.म्हात्रे, पोउपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहा.पो. उप. निरी. शिवानंद सुतनासे, पोहवा. अनिल शिंदे, पो.ना. आनंद मोरे, उमेश वरठा, शेखर पवार, पो.अं. अशपाक जमादार, छपरीबन, एस डी गडाख व विनायक राऊत यांनी केलेली आहे.

-

